पुनर्रचित हवामान आधारीत पीक विमा योजनेमध्ये सन२०१७-१८ साठी फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा रक्कम रु.४३३.२६ कोटी मृग व आंबिया बहाराकरीता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- पुरक-२०१७/प्र.क्र.१७२/१३-अे,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक :- २४ जानेवारी, २०१८

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. विमायो-१०१७/प्र.क्र.३२/१४-अे, दि. १९/७/२०१७

२) शासन निर्णय क्र. विमायो-१०१७/प्र.क्र.१३५/१४-अे, दि.२८/९/२०१७

३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/फलो-१/पुहआफपिवियो/२७२०/१७,दि.६/११/१७.

प्रस्तावना:-

प्रधानमंत्री फसल बीमा योजनेंतर्गत राज्यात पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना ही कमी /जास्त पाऊस, वेगाचा वारा, गारपीट व सापेक्ष आर्द्रता इत्यादी हवामान धोक्यापासून निर्धारित केलेल्या कालावधीत शेकऱ्यांना विमा संरक्षण आणि आर्थिक सहाय्य देण्याच्या प्रमुख उदेशाने राबविण्यात येते. त्यामुळे फळपिक नुकसानीच्या अत्यंत कठिण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यास मदत होते. सदर योजना मृग व आंबिया बहाराकरीता सन २०१६-१७ पासून महसुल मंडळ हा घटक धरुन राबविण्यात येत आहे.

प्रधानमंत्री फसल बीमा योजनेंतर्गत राज्यात पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना २०१७-१८ (आंबिया बहार व गारपिट) मध्ये द्राक्ष,संत्रा,मोसंबी,डाळिंब, केळी,आंबा, काजू, पेरु व लिंबू या फळ पीकांकरिता लागू करण्यास शासन निर्णय क्र. विमायो-१०१७/प्र.क्र.३२/१४-अे, दि. १९/७/२०१७ (मृग बहारासाठी) व शासन निर्णय क्र. विमायो-१०१७/प्र.क्र.१३५/१४-अे, दि.२८/९/२०१७(आंबिया बहारासाठी) प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

पुनर्रचित हवामान आधारीत पीक विमा योजनेमध्ये सन २०१७-१८ मृग बहार मध्ये एकुण ८०४१६ शेतक-यांनी ७५३६६.३५ हेक्टर क्षेत्रावर सहभाग घेतला आहे .तसेच आंबिया बहारामध्ये १९७२७९.५० हेक्टर क्षेत्रावर शेतकरी सहभाग अपेक्षीत धरुन फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा रक्कम रु ४३३.२६ कोटी मृग व आंबिया बहाराकरीता रिलायन्स, इफको टोकीयो, बजाज व एच.डी.एफ.सी एर्गो या विमा कंपनीस देय आहे .वित्त विभागाने फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा रक्कम रु.४३३.२६ कोटी पुरवणी मागणीवदारे मंजूर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय -

पुनर्रचित हवामान आधारीत पीक विमा योजनेमध्ये सन २०१७ - १८ मृग बहार तसेच आंबिया बहारामध्ये फळपिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य हिस्सा रक्कम रु. ४३३.२६ कोटी मृग व आंबिया बहाराकरीता रिलायन्स, इफको टोकीयो, बजाज व एच.डी.एफ.सी एर्गो या विमा कंपनीस देय असलेला निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच वित्त विभागाने शासन निर्णय क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०/६/२०१७ अन्वये मंजूर निधी ४३३.२६ कोटीपैकी महसूली लेख्यातील निधी ७०% वितरीत करण्याचे निदेश दिलेले आहे. त्याअनुषंगाने सदर निधीस वित्तीय मान्यता देवून वितरीत करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे. तथापि, कंपनीस देय असलेल्या रकमेची योग्य ती परिगणना करुन व त्याबाबत छाननी करुनच सदर

रकमा अदा करण्याची दक्षता कृषि आयुक्तालयाने घ्यावी व बचतीची रकम असल्यास विहित मुदतीत शासनास समर्पित करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२४१७५२५४६३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.01.24 17:57:06 +05'30'

(चं.वि.घायतडक)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
४. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई -३२,
११.अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३.कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४.निवड नस्ती (१३-अे)